!! श्री !!

शिवसेना

# खासदार चंद्रकांत खैरे

शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प ४७६ ०९-३-२०१६

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# संभाजीनगर दिल्ली, विमानसेवा सुरू करा
# शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांची लोकसभेत मागणी

**नवी दिल्ली दि ९-** महाराष्ट्राची पर्यटन राजधानी अशी ओळख असणाऱ्या संभाजीनगर जिल्ह्यात अजिंठा, वेरूळ लेणी, बीबीचा मकबरा अशी जगविख्यात ऐतिहासिक पर्यटनस्थळे आहेत ५३२ मोठे औद्योगिक प्रकल्प आहेत त्यातील बहुतांश कंपन्या या बहुराष्ट्रीय आहेत. शिवाय महत्वाकांशी दिल्ली मुंबई इंडस्ट्रीयल कोरीडॉर चा मोठापट्टा इथे झपाट्याने विकसित होत आहे या सर्व पूरक वातावरणाचा विचार करून दिल्ली, मुंबई, संभाजीनगर, उदयपूर, जयपूर, इंदोर, गोवा अशी विमानसेवा सुरू करण्याची मागणी शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी आज लोकसभेच्या शुन्य प्रहरात केली

सध्या संभाजीनगर हून दिल्ली जाण्यासाठी एकच विमान दिल्ली जाण्यासाठी फक्त सायंकाळी एक विमान आहे तर दिल्लीहून सुद्धा सायंकाळीच उड्डाण भरते येथील संधी आणि प्रवाशांची मागणी लक्षात घेता दिल्ली ला जाण्यासाठी सकाळी व दिवसाच्या वेळेत हि अजून विमानसेवेची आवश्यकता आहे. शिर्डी जाणाऱ्या भाविकांसह पर्यटक उद्योजक यांच्यासाठीही हि विमानसेवा लाभदायक ठरेल असा विश्वास शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी लोकसभेत व्यक्त करत दिल्ली संभाजीनगर साठी नाविन विमानसेवा सकाळच्या वेळेत सुरु करण्याची मागणी केली.

संभाजीनगरच्या चिकलठाणा विमानतळाला आयएसओ २००९ आणि आयएसओ १४००१ मिळालेले विमानतळ असून जास्त रहदारी, विमानफऱ्या होत नसल्याने इंधनाचा अपव्यय हि येथे होत नाही.फ़ेब्रूवारि २०१५ मध्ये या विमानतळाला आंतरराष्ट्रीय विमानतळ म्हणून घोषित केले आहे शिवाय सर्व विमानसेवा देणाऱ्या कंपन्यांसाठी कार्यालये सुरु करण्यासाठीहि मुबलक जागा उपलब्ध आहे या सर्व उपलब्धी लक्षात घेऊन संभाजीनगर ला दिल्ली, मुंबई, संभाजीनगर, उदयपूर, जयपूर, इंदोर, गोवा आदींशी विमानसेवेने जोडण्यात यावे अशी मागणी लोकसभा सदनाच्या माध्यामातून नागरी उड्डाण मंत्री यांच्याकडे खासदार चंद्रकांत खैरे यांनी केली आहे सध्या एकच विमान संध्याकाळी जात असल्याले उद्योजक, पर्यटक तसेच तातडीने जाण्याची गरज असणाऱ्या प्रवाशांची धावपळ होते. तसेच मोठ्या रकमेचा भुर्दंडही बसतो. ही गैरसोय टाळण्याबरोबरच पर्यकांना झटपट राजस्थान तसेच शिर्डी, जगप्रसिद्ध वेरूळ, अजिंठ्याला येता यावे म्हणून पर्यटकांच्या सोयीसाठी संभाजीनगरहून दिवसा विमानसेवा असणे गरजेचे आहे. मुंबई, गोवा, उदयपुर, जयपूर विमानसेवेमुळे परदेशी पर्यटक थेट वेरूळ-अजिंठा पाहण्यासाठी येऊ शकतील असेही खासदार चंद्रकांत खैरे यांनी लोकसभेत स्पष्ट केले

प्रसिध्दी प्रमुख

योगेश पायघन / गणेश वाघ.

कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : (०२४०) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : (०२४०) २३४३०२५

cbkhaire@gmail.com ,
8484066606/9604384400/

yp4329@gmail.com
7769052525